2019-20

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**Guest Editor:**
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

| | | |
|---|---|---|
| 149 | घरेलु हिंसा/अत्याचार और महिला स्वास्थ्य डॉ.स्मिता संतोष गिरी | 646 |
| 150 | घरगुती हिंसाचारातून निर्माण झालेल्या परित्यक्त्या महिलांच्या सामाजिक समस्या आणि त्यावरील उपाय प्रा. डॉ. गजेंद्र कढव | 650 |
| 151 | आघाडी सरकार आणि भारतीय राजकारण प्रा. डॉ . राजेंद्र मुद्दमवार | 653 |
| 152 | भाषा शिक्षणाची प्रभावी कार्यप्रणाली प्रा.डॉ.सुदर्शन दिवसे | 557 |
| 153 | कौटुंबिक अत्याचाराचा भारतीय समाजव्यवस्थेरील दुष्परिणाम प्रा.संजय के.चव्हाण | 564 |
| 154 | लांबलेल्या सावल्यातील : व्यक्तींदर्शन प्रा. स्मिता गोवर्धन शहाणे | 670 |
| 155 | Role of Music in maintaining Social Health *प्रा.डॉ.जयश्री विश्राम कुळकर्णी* | 675 |
| 156 | चित्रा मुद्गल के उपन्यासों में हिंसा के प्रति विद्रोही नारी प्रा.डॉ.निशाली पंचगाम। | 677 |
| 157 | आर्थिक ताण आणि घरगुती हिंसा डॉ. जयंत आ. बुराडे, | 682 |
| 158 | बळी — कौटुंबिक अत्याचाराचा विध्दवंस प्रा. डॉ. बंडू चौधरी | 684 |
| 159 | स्त्रियांवरील अत्याचार व कायदे प्रा. बाळकृष्ण कारु रामटेके | 687 |
| 160 | घरेलू हिंसा की जंजीरो में जकडी नारी—हिंसा दूर करने के उपाय डॉ. ममता राममिलन साहू | 695 |
| 161 | घरेलु हिंसा. एक वास्तव. डॉ.विजय कृष्णराव काळे | 699 |
| 162 | मानवी हक्क : बालगुन्हेगारी न्याय व शासनाची भूमिका प्रा. डॉ. संदीप भि. काळे | 703 |



Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# घरगुती हिंसाचारातून निर्माण झालेल्या परित्यक्त्या महिलांच्या सामाजिक समस्या आणि त्यावरील उपाय

प्रा. डॉ. गजेंद्र कढव
समाजशास्त्र विभागप्रमुख महात्मा गांधी महाविद्यालय,आरमोरी, जि. गडचिरोली

## ➢ प्रस्तावना :—

भारतामध्ये स्त्रीला शक्ती, दुर्गा, पुरूषांची अर्धांगिनी म्हणून तिचा गौरव केला जातो. 'मातृ देवो भव' असे सर्वप्रथम म्हणण्यात येते. परंतु याच देशामध्ये पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना दुय्यम समजले जाते. भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या तुलनेत महिलांची लोकसंख्या निम्मी असली तरी आज ही तिला स्वतःच्या घरात दुय्यम वागणूक दिली जाते. तिला तिचे माणूस म्हणून स्वतंत्र्य अस्तित्व मान्य केले जात नाही समाज सुद्धा तिला हिन—दीन, दुबळी पराया धन म्हणून वागणूक देतो. तिला समाजाने अनेक अधिकारांपासून वंचित ठेवले आहेत. याचाच परिणाम असा झाला की, महिला पुरूषांच्या तुलनेत खूप मागे पडल्या. आणि त्यांच्या समोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. त्यातीलच एक प्रमुख समस्या म्हणजे परित्यक्ता महिलांची समस्या होय. आज नागरीकरण, आधुनिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचाप्रसार, औद्योगीकरण इत्यादी कारणांमुळे भारतामध्ये परित्यक्ता महिलांची संख्या खूप मोठ्याप्रमाणात वाढत आहे. आज स्त्रियांच्या हितसंबंधाचे आणि संरक्षण करण्यासाठी हुंडाबंदी कायदा, घरगुती हिंसाचार कायदा इत्यादी कायदे अस्तित्वात असले तरी आज महिलांवरील हिंसाचार आणि अत्याचाराच्या संख्येत खूप वाढ होताना दिसते. परित्यक्ता महिलांची संख्या सुद्धा वाढत आहे. त्यांच्या समस्या कोणत्या यांचा अभ्यास करण्यापूर्वी परित्यक्ता म्हणजे काय ते खालील अर्थातून लक्षात येईल.

## ➢ परित्यक्ता या संकल्पनेचा अर्थ :—

परित्यक्ता म्हणजे ज्या स्त्रीला तिच्या वतीने सोडून दिले आहे अशी स्त्री होय.जी पत्नी पतीला पूर्वी आवडत होती, परंतु आता आवडत नाही म्हणून तिला घरातूनबाहेर काढतो अशी स्त्री म्हणजे परित्यक्ता स्त्री होय.

परित्यक्ता ही संकल्पना परित्याग या शब्दापासून तयार झालेली असल्याचे दिसून येते. परित्याग हा शब्द परि म्हणजे स्त्री आणि त्याग म्हणजे सर्वस्वी सोडणे, टाकणे अशा दोन शब्दांपासून बनला आहे.

हुंडा कमी मिळणे, पतीची व्यसनाधिनता किंवा आपल्याला कल्पनाही येणार नाही अशा अनेक कारणांसाठी पती व कुटुंबातील व्यक्ती पत्नीचा शारीरिक आणि मानसिक शोषण करतात आणि तिला घराच्याबाहेर काढतात.

परित्यक्ता महिलांना जिवंतपणी अनेक प्रकारच्या मरणयातना भोगाव्या लागतात. तिच्या समोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. यातील काही महिला नाईलाजाने देहव्यापार या व्यवसायात काम करतांना दिसतात. आजही भारतामध्ये देहव्यापार व्यवसाय करणाऱ्या महिलांमध्ये परित्यक्ता महिलांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच या महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

## ➢ महिला परित्यक्ता होण्याची कारणे :—

पती आपल्या पत्नीचा का त्याग करतो.हे खालील कारणांव्दारे सांगता येते.

१) पुरूषप्रधान संस्कृती आणि महिलांना समाजा मध्ये दुय्यम स्थान असणे.
२) पुरूषांचा संशयीपणा हे सुद्धा महिला परित्यक्त्याचे एक कारण आहे.
३) महिलांना संपत्ती मध्ये समान हिस्सा नसणे.
४) पत्नीचे विवाहबाह्य संबंध असणे.
५) पतीला जुगार, सट्टा, अंमलीपदार्थाचे सेवन अशाप्रकारचे व्यसन असणे.
६) महिला फक्त उपभोग्य वस्तू आहे अशी मानसिकता असणे.
७) विवाहामध्ये हुंडा कमी मिळणे किंवा पत्नी मानसिक रोगी असेल.
८) पती—पत्नी, सून—सासू याच्यामध्ये कौटुंबिक कलह निर्माण होणे.



Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori
Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli